# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### गुड्डीगुडम (जि.गडचिरोली) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) २०३५६ (०८-०८-२०२३) : श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहेरी पंचायत समितीअंतर्गत ग्रामपंचायत तिमरस्थित गुड्डीगुडम (जि.गडचिरोली) हा रस्ता पूर्णत: उखडलेला असल्याने रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०८-०९-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रश्नांकित रस्ता हा रस्ते विकास आराखड्यानुसार गुड्डीगुडम पोचमार्ग प्र.रा.मा.९ ला जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.९१ असून त्याची लांबी २.३० कि.मी. एवढी आहे. सदर रस्त्याची सा.क्र.०/०० ते ०/६०० मधील लांबी खडीकरणाची व सा.क्र.०/६०० ते २/३०० मधील लांबी डांबरी पृष्ठभागाची असून काही भाग नादुरुस्त आहे.
सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सन २०२३-२४ मध्ये रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनेतून जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात येत असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्ह्यातील डोंगरमाथ्यावर व डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या गावांकरीता सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याबाबत

**(२) २१०३४ (१७-१२-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील ३५५ गावांना पावसाळ्यात पुराचा धोका निर्माण होण्याची तसेच डोंगरमाथ्यावर व डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या १०३ गावांना दरडीपासून धोका उद्भवण्याची शक्यता वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्तविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात गांभीर्याने विचार करून सदरहू ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या ग्रामस्थांच्या तसेच मालमत्तेच्या सुरक्षितेच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (०५-०९-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील दरडप्रवण क्षेत्रातील १८१ गावांचे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग पुणे यांचेमार्फत भूवैज्ञानिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. तसेच २३९ संभाव्य दरडग्रस्त गावांचे GSI सर्वेक्षण करणेबाबत उपसंचालक भारतीय भूवैज्ञानिक विभाग पुणे यांना कळविण्यांत आले आहे. दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने भूवैज्ञानिक मानकांच्या आधारे १०३ गावांचा भूवैज्ञानिक सर्वेक्षणाचा अभ्यास अहवाल पाठविला आहे.
(२) रायगड जिल्ह्यातील तालुक्यातील दरडप्रवण गावे, पुरप्रवण गावे, याठिकाणी आपत्कालीन बाब उद्भवल्यास तात्पुरत्या स्थलांतरासाठी शाळा, समाजमंदीर इ. ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी गावनिहाय तलाठी, ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, कृषी सहाय्यक /कृषी सेवक, कोतवाल, पोलीस पाटील, आपदा मित्र/सखी, स्थानिक स्वयंसेवी संस्थामधील सदस्य मिळून पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच कोणत्याही आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी जिल्हातील सर्व तहसिल कार्यालयांमध्ये २४X७ तास तालुका नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाथर्डी (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरपाडा गावातील ग्रामस्थांना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(३) २११०८ (०३-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील पाथर्डी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरपाडा गावातील सुमारे १५ घरांची अवकाळी पावसामुळे पडझड झाली असल्याची घटना दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नुकसानीचे पंचनामे शासनाने केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेतील नुकसानग्रस्त ग्रामस्थांना तातडीने नुकसानभरपाई अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (०५-०९-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदरहू प्रकरणी क्षेत्रिय स्तरावरुन अहवाल प्राप्त प्रकरणावर कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहर व परिसरामध्ये 'सखी निवास योजने' अंतर्गत महिलांसाठी वसतिगृहे सुरु करण्याबाबत

**(४) २१४९४ (०५-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहर व परिसर हे उद्योग व व्यवसायाचे मोठे केंद्र असल्याने जिल्ह्यातील विविध गावांतून व जिल्ह्याबाहेरुनही अनेक महिला व युवती नोकरी निमित्त शहरात येत असून त्यांना वास्तव्याकरीता अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोकरीनिमित्त शहरात येणाऱ्या महिलांकरीता सुरक्षित वास्तव्याची सुविधा निर्माण होणे अत्यंत गरजेचे असून, अशा नोकरदार महिलांसाठी केंद्र सरकारने 'सखी निवास योजना' सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नोकरदार महिलांसाठी महानगरपालिकेने कोल्हापूर शहरात किमान तीन ते चार ठिकाणी जागा उपलब्ध करून देऊन 'सखी निवास योजने' अंतर्गत महिलांसाठी वसतिगृहे सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१०-१०-२०२४) :** (१) कोल्हापूर शहर व परिसर हे उद्योग व व्यवसायाचे मोठे केंद्र असल्याने जिल्ह्यातील विविध गावांतून व जिल्ह्याबाहेरुनही अनेक महिला व युवती नोकरी निमित्त शहरात असून, त्यांना वास्तव्याच्या अडचणींचा सामना करावा लागत नाही. सदर नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ०४ वसतिगृह कार्यरत आहेत. सदर ०४ वसतिगृहांची एकूण क्षमता २६६ प्रवेशित इतकी असून, सद्य:स्थितीत सदर वसतिगृहामध्ये एकूण २५५ महिला प्रवेशित वास्तव्यास असून महिला प्रवेशितांसाठी अद्याप ११ जागा रिक्त आहेत.
(२) होय.
(३) शासन निर्णय, दिनांक १२/०५/२०२३ अन्वये राज्यात सद्य:स्थितीत सुरु असलेली "नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह" ही योजना केंद्र शासनाच्या "मिशन शक्ती" अंतर्गत "सामर्थ्य" या उपयोजनेंतर्गत "सखी निवास" नावाने राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर "सखी निवास" या घटक योजनेनुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह सुरु करण्यात येणार असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील समग्र शिक्षण अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करुन शासनसेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत

**(५) २१५९६ (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय येथे समग्र शिक्षा अभियानांतील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समग्र शिक्षा अभियानांतर्गत वीस वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत सामावून घ्यावे, तसेच त्यांना सातवा वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी या आंदोलकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीचा सादर केलेला प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१०-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
समग्र शिक्षा अभियानांतर्गत कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठी दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी आंदोलन करण्यात आले होते.
(२) हे खरे आहे.
(३) समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांच्या मानधनात १० टक्के वाढ करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवापूर व खापर (जि.नंदुरबार) तालुक्यामध्ये विनापरवाना अवैध वाहतूक सुरु असल्याबाबत

**(६) २१६४६ (०५-०१-२०२४) : श्री आमश्या पाडवी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील गुजरात सीमेवर उभारण्यात आलेल्या नवापूर व खापर नाक्यावरुन विनापरवाना होणारी अवैध वाहतूक ही प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगनमत करुन सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणांहून गौण खनिजांचीही अवैध वाहतूक होत असल्याप्रकरणी प्रादेशिक परिवहन अधिकारी, जि.नंदुरबार यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठूवन त्यांची विभागीय व लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन आयुक्त, मुंबई यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन अवैध वाहतूक व गौण खनिज वाहतूक करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०७-२०२४) :** (१) नाही.
(२) होय.
(३) विना परवाना गौण खनिज वाहतूक हा विषय प्राधान्याने महसूल विभागाशी संबंधित असून याबाबतची कार्यवाही महसूल विभागाव्दारे करण्यात येते. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास मदतीसाठी परिवहन विभागाचे अधिकारी संयुक्त पथकामध्ये उपस्थित राहून दोषी वाहनांवर कारवाई करतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मुदतबाह्य तपासणी किट वापरले जात असलेबाबत

**(७) २१८४३ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गाठीचे निदान करण्यासाठी मुदत संपलेले तपासणी किट वापरले जात असून त्यामुळे रुग्णांचे जीव धोक्यात असल्याने दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास श्री.पियुष पाटील यांनी मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे तक्रार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१९-०७-२०२४) :** (१) व (२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभाग, जळगांव यांनी दिनांक १२/०८/२०२३ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव येथील पॅथालॉजी लॅबला भेट देऊन जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केला होता.जिल्हाधिकारी यांनी सदर अहवालानुसार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव यांना कालबाह्य/मुदत संपलेल्या वैद्यकीय साहित्याची विल्हेवाट मानक

कार्यपध्दतीने करण्याचे व इतर निर्देश दिले होते. त्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबंधित डॉक्टर व कर्मचारी यांना ज्ञापन देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ‘जॉन्सन ॲण्ड जॉन्सन’ बेबी पावडरच्या उत्पादनांमुळे पिडीत ग्राहकांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत

**(८) २१९४९ (०५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सौंदर्य प्रसाधन चाचणीकरीता BIS मानकानुसार चाचणी केली जाते, मानकानुसार Baby Talcum Powder करीता pH मर्यादा ५.५ to ८ ही असून, Johnsons Baby Powder, B. No.B३R८०८०४ या समूह क्रमांकाचा पाठ पुनर्तपासणीसाठी केंद्रीय प्रयोगशाळा कलकत्ता येथे पाठविला असता, त्यांचे pH हे ८.४२ इतके असल्याचे त्यांच्या विश्लेषण अहवालात नमूद केले आहे, सदर pH हे BIS मानकांपेक्षा जास्त असल्याने सदरचा नमुना अप्रमाणित घोषित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ‘जॉन्सन ॲण्ड जॉन्सन’ बेबी पावडरच्या उत्पादनांमुळे पिडीत ग्राहकांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत, तसेच ‘जॉन्सन ॲण्ड जॉन्सन’ कंपनीवर गुन्हा दाखल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन महोदय यांच्याकडे दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू निवेदनात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने ‘जॉन्सन ॲण्ड जॉन्सन’ बेबी पावडरच्या उत्पादनांमुळे पिडीत ग्राहकांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत, तसेच सदरहू कंपनीवर गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा अत्राम (०९-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ तसेच औषध प्रशासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या इतर कायद्यांमध्ये पिडीत ग्राहकांना नुकसान भरपाई देण्याबाबत तरतुद नाही. सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाद्वारे दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या आदेशान्वये संस्थेस मंजूर ‘जॉन्सन बेबी पावडर’ या सौंदर्य प्रसाधनाच्या उत्पादन पाठाची मंजूरी रद्द करण्यात आली होती. सदर आदेशाविरुध्द संस्थेने शासनाकडे अपील दाखल केले होते. शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ च्या आदेशान्वये अन्न व औषध प्रशासनाने पारित केलेले आदेश कायम ठेवले होते. सदर संस्थेने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले होते. मा उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक ११ जानेवारी, २०२३ च्या आदेशाद्वारे परवाने प्राधिकारी, अन्न व औषध प्रशासन,

बृहन्मुंबई व अपिलीय प्राधिकारी म्हणून शासनाने पारित केलेले उक्त पाठाचे परवाने रद्द आदेश निरस्त केले व संस्थेस उत्पादन सुरु करण्यास परवानगी दिली होती. परंतु, सदर संस्थेने त्यांना मंजूर सौंदर्य प्रसाधन उत्पादन परवाना सर्व मंजूर पाठासह दिनांक १९ जून, २०२३ रोजी स्वतःहून प्रत्यार्पित (Surrender) केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शिक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत

**(९) २२०८३ (०५-०१-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या अशासकीय पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून अनेक ठिकाणी विभाग बंद पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशासकीय पूर्व व्यावसायिक शाळातून शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर यांची रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१४-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५/०५/२०१७ प्रमाणे विभागाचा आकृतिबंध (पदांचा आढावा) मंजूर झालेला नाही. तसेच वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक ३०/०६/२०१७ मुद्दा क्र.५(क) नुसार विभागातील विद्यार्थी / शिक्षक गुणोत्तराचा आढावा घेऊन काही अभ्यासक्रम कमी करणे, रिक्त पदे न भरणे, पद संख्या कमी करणे या माध्यमातुन खर्चावर नियंत्रण आणण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.
त्याअनुषंगाने राज्यामध्ये राबविण्यात येणारे माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण आराखड्याप्रमाणे (NSQF) सुसंगत करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पदांचा आकृतिबंध तयार करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पूर्व व्यावसायिक शिक्षकांच्या विनाअनुदानित कालावधीतील सेवेस मान्यता देणेबाबत

**(१०) २२०८४ (०५-०१-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या कर्मचाऱ्यांना विनाअनुदानातील कालावधीतील सेवेस (सन १९८२ ते १९९०) मान्यता देण्यासंदर्भात दिनांक ११ जुलै, २०१० रोजी शासन आदेश निर्गमित होऊनही सदर प्रश्न अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासन आदेशानुसार सन १९८२ ते १९९० या कालावधीतील विनाअनुदानित सेवेस मान्यता देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१४-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम व व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विनाअनुदानित काळात केलेली सेवा वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत विभागाच्या प्रस्तावास शासनाची सहमती मिळालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील उघड्या गटारांवरील झाकणे बसविण्याबाबत

**(११) २२३३५ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात घरपट्टीची आकारणी करत नागरी सुविधा महानगरपालिका प्रशासनाकडून दिल्या जात असून वसई-विरार शहरात पाणी तुंबून गटारावरील तुटलेल्या झाकणांमुळे व उघड्या गटारांमुळे अनेक नागरिक गटारात पडून मृत्यू पावले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेने शहरातील उघड्या गटारांवरील झाकणे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली, तसेच शहरातील या उघड्या गटारांवरील झाकणे बसविण्यासाठी माहे नोव्हेंबर, २०२२-२०२३ अखेरपर्यंत किती खर्च झाला याबाबतचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली तसेच महानगरपालिका क्षेत्रातील उघड्या गटारावरील झाकणे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०७-२०२४) :** (१), (२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार अशा प्रकारची घटना ऑक्टोबर, २०२३ व त्या सुमारास घडल्याचे आढळून येत नाही.
तसेच प्रतिवर्षी आरोग्य अधिकारी व कनिष्ठ अभियंता यांच्यामार्फत नियमित सर्व गटारांची पाहणी करण्यात येत असून ज्या ठिकाणी चेंबर कव्हर नाहीत किंवा ज्या ठिकाणी दुरूस्ती करणे आवश्यक आहे अशा ठिकाणी चेंबर कव्हर बसविण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येत आहे.

शहरातील उघड्या गटारावरील झाकणे बसविण्यासाठी माहे नोव्हेंबर, २०२२ ते मार्च, २०२३ पर्यंत रुपये ६.१९ कोटी इतका खर्च करण्यात आला असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत सर्व शाळांना अनुदान देण्याबाबत

**(१२) २२३८५ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत नागपुरातील जिल्हा परिषद शाळांना मागील वर्षभरापासून अनुदान प्राप्त झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत जिल्हा परिषद शाळांना पटसंख्येच्या प्रमाणात संयुक्त शाळा अनुदान मिळते त्यातुनच शालेय दप्तर, शैक्षणिक साहित्य, क्रिडाविषयक खर्च, पाणी स्वच्छता, वीज बिल भरणा याकरीता हे अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यानुसार एकूण किती शाळांना मागील वर्षांपासून या योजनेतंर्गत अनुदान प्राप्त झाले नाही, तसेच सदर अनुदान देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (११-०७-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत सन २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षात नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळांना संयुक्त अनुदान देण्यात आले असून निधी शाळा स्तरावर खर्च झाला आहे. सदर निधी खर्च झाल्याची उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा स्तरावर प्राप्त झाले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिकठाण (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत मौजे घाणेगांव येथे आरोग्य उपकेंद्रास मंजूरी देणेबाबत

**(१३) २३०६२ (१८-०७-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिकठाण (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत मौजे घाणेगांव येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास मंजूरी देण्यात आलेली असून, प्राथमिक आरोग्य केंद्र जिकठाण यांचे पत्र दिनांक १५ जुलै,२०२१ अन्वये ग्रामपंचायत घाणेगांव यांनी गायरान सर्व्हे.नं.२४३ मधील जमिनीचा ८ अ उतारा नकाशा, ग्रामपंचायत ठराव व ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाणेगांव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम करण्याच्यादृष्टीने जमिनीचा ताबा घेण्यासाठी जिल्हा परिषदेने आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव सादर केला असून जिल्हा प्रशासनाने अद्याप मान्यता दिली नसल्याने प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामास सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देवून जमिनीचा ताबा जिल्हा परिषद प्रशासनाकडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०९-२०२४) :** (१), (२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांचा मौजे घाणेगाव, ता.गंगापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राबाबत जमीन मागणीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे अप्राप्त आहे. पर्यायाने हा प्रस्ताव शासनासदेखील अप्राप्त आहे. सदर प्रकरणी परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूची चौकशी करणेबाबत

**(१४) २३२५५ (२३-०५-२०२४) : श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत ५ वर्षात आदिवासी आश्रम शाळेतील ११४४ विद्यार्थ्यांचा विविध आजाराने मृत्यू झाला असताना शासनाने केवळ १०८ मृत्यूंची जबाबदारी घेतली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या आजाराचे गांभीर्य लक्षात घेता त्यांना पालकाच्या स्वाधीन केले जाते व घरी गेल्यावर विद्यार्थी मृत पावल्यास त्याची नोंद किंवा जबाबदारी शाळा प्रशासन अथवा शासन घेत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विधिमंडळ सदस्यांची विशेष चौकशी समिती नेमून सदर मृत विद्यार्थ्यांच्या पालकांना अनुदानाची रक्कम मिळवून देणेबाबत, तसेच याबाबत कालबध्द कार्यक्रम आखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (०१-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.

गत ५ वर्षात शासकीय/अनुदानित आश्रमशाळेत एकूण ९०२ विद्यार्थी विविध घटना/कारणांने मृत्यू पावले आहेत. त्यापैकी ८१८ विद्यार्थ्यांचा मृत्यू पालकांच्या ताब्यात असताना झाला आहे व ८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू शाळेच्या ताब्यात असताना झाला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांच्या आजाराचे गांभीर्य लक्षात घेता विद्यार्थ्यांला योग्य व तात्काळ उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय वा जिल्हा रुग्णालयात उपचार केले जातात.

घरी असताना विद्यार्थी आजारी झाल्यास पालकांनी शाळेला माहिती दिल्यास किंवा विद्यार्थी आजारी आहे हे शाळेला माहिती झाल्यास त्या विद्यार्थ्यांस शाळेमार्फत दवाखान्यात दाखल केले जाते व त्याचा औषध उपचाराचा पूर्ण खर्च शाळेमार्फत केला जातो. दुर्देवाने विद्यार्थ्यांचा मुत्यु झाल्यास शासनाकडुन विद्यार्थ्यांच्या पालकांस सानुग्रह अनुदान रुपये २.०० लक्ष दिले जाते.

त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांच्या मुत्यु प्रकरणी/ आत्महत्या प्रकरणी सन २०२३-२४ पासून शासनस्तरावर आश्रमशाळेमध्ये मुत्यु कमी करण्याच्या दृष्टीने नियोजन आराखडा तयार केला असून याकरता National Institute of Mental Health and Neuro Science, Benglure, Karnataka (NIMHANS) यांचे तांत्रिक मार्गदर्शन घेण्यात येत आहे. सदर संस्था आरोग्य विभागाच्या मदतीने आत्महत्या व इतर कारणांनी होणारे मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने NIMHANS व्दारे नियुक्त करण्यात आलेल्या वैद्यकीय पथकाव्दारे सर्वेक्षण करुन उपाययोजना केली जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना कर्मचारी वर्गाअभावी बंद झाल्याबाबत

**(१५) २३५०५ (१७-०६-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील अल्प व अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरीता केंद्र शासनाने सुरू केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अहमदनगर तालुक्यात निरुपयोगी ठरत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर तालुका कृषी कार्यालयात कर्मचारी वर्गच नसल्याने शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे तालुक्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना बंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना अहमदनगर तालुक्यात प्रभावीपणे राबविण्याकरीता शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२८-०९-२०२४) :** (१) हे, खरे नाही.

(२) हे, खरे नाही.

(३) राज्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच दिनांक १५/०२/२०१९ व दिनांक १५/०६/२०२३ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहे. क्षेत्रियस्तरावर उपलब्ध मनुष्यबळामार्फत तसेच CSC व IPPB यांचे सहकार्याने विशेष मोहीम राबवून लाभार्थीची

ईकेवायसी, बँक खाते आधार संलग्न करणे व भुमी अभिलेख नोंदी अद्ययावत करणे या प्रलंबित बाबींची पूर्तता करण्यात येत आहे. सदर योजनेच्या लाभापासून राज्यातील कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये व जास्तीत जास्त पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ मिळण्यासाठी संपृक्तता मोहीम (Saturation Drive) राबविण्यात येत आहे.

पी.एम. किसान पोर्टल नुसार अहमदनगर तालुक्यातील एकूण ४४,००२ नोंदणीकृत लाभार्थी असून ३०,८८२ लाभार्थी पात्र आहेत. दिनांक १८ जून, २०२४ रोजी वितरीत केलेल्या पी.एम. किसान योजनेच्या १७ व्या हप्त्यावेळी नगर तालुक्यातील ३०१२४ लाभार्थींना रक्कम रुपये ६.०८ कोटी थेट हस्तांतरणाद्वारे वितरीत करण्यात आला आहे. पी.एम.किसान योजनेच्या एकूण १७ हप्त्यांमध्ये नगर तालुक्यातील लाभार्थींना एकूण रक्कम रुपये १११.९२ कोटी अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना १ रुपया पीक विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(१६) २३५७० (२०-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेल्या १ रुपया पीक विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबतच्या योजनेची फलश्रूती झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात किती शेतकऱ्यांनी या पीक विमा योजनेचा लाभ घेतला आहे, पीक विमा योजनेचा लाभ घेतलेल्यांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १ रुपया पीक विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१६-०९-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप २०२३ मधील एकूण नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्याचे वाटप पूर्ण होणे अंतिम टप्प्यात आहे. रब्बी २०२३-२४ मधील अंतिम नुकसान भरपाईची परिगणना करणे व त्यानुसार वाटपाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२३ मध्ये राज्यातील १.७१ कोटी शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेऊन ११३.२७ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले. खरीप २०२३ मध्ये दिनांक २७/०८/२०२४ अखेर विविध बाबीअंतर्गत एकूण ११५.९० लाख लाभार्थ्यांना रुपये ७३८२.५९ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ८७.६५ लाख शेतकऱ्यांना रुपये ४७५८.९३ कोटी नुकसान भरपाईचे वाटप कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच, रब्बी २०२३-२४ मध्ये राज्यातील ७१.८७ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेऊन ४९.९८ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले. रब्बी २०२३-२४ मध्ये दिनांक २७/०८/२०२४ अखेर

विविध बाबीअंतर्गत एकूण ३.५७ लाख लाभार्थ्यांना रुपये २९२.२६ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी १.६१ लाख शेतकऱ्यांना रुपये १२२.४० कोटी नुकसान भरपाईचे वाटप कंपन्यांमार्फत करण्यात आले आहे. उर्वरित नुकसान भरपाई परिगणना व वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दस्त नोंदणीच्या संकेतस्थळावरील कामकाज संथगतीने होत असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याबाबत

**(१७) २३७७५ (१८-०७-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुद्रांक शुल्क विभागामार्फत खरेदी, विक्री व बक्षीसपत्र दस्त नोंदविण्यात येत असून शासनाच्या संकेतस्थळावर कामाचा ताण जास्त प्रमाणात पडत असल्याने त्याचा परिणाम दस्त नोंदविण्याच्या क्षमतेवर होऊन संकेतस्थळाचे सर्व्हर अनेक वेळेस संथगतीने काम करीत असल्याच्या घटना वारंवार घडत असल्याने शासनाच्या कामकाजाचा व नागरिकांचा वेळ वाया जात असून त्याचा परिणाम दस्त नोंदणीवर होत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.

राज्यात नोंदणी व मुद्रांक विभागामार्फंत खरेदी, विक्री व बक्षीसपत्र तसेच इतर मिळकतीच्या व्यवहारांच्या नोंदणीचे कामकाज करण्यात येते. सदर दस्त नोंदणीचे कामकाज हे संगणकीय आय सरिता प्रणालीव्दारे होत असते. माहे मार्च, २०२३ व मार्च, २०२४ मध्ये झालेल्या दस्त नोंदणीची संख्या ही माहे मार्च, २०२३ पेक्षा मार्च, २०२४ मध्ये जास्त दस्त नोंदणी झालेली आहे.

सबब सर्व्हर संथगतीने चालत असल्याची वस्तुस्थिती नाही. तसेच दस्त नोंदणीच्या संख्येवर कुठलाही परिणाम झालेला नाही. त्यामुळे शासनाच्या कामाकाजचा व नागरिकांचा वेळ वाया गेलेला नाही.

(२) लागू नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चर्नीरोड येथे मराठी भाषा भवन उभारण्याबाबत

**(१८) २३८११ (२२-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्नी रोड येथे मराठी भाषा भवन इमारत उभारण्यासंदर्भात शासनाने यावर्षी मराठी भाषा भवनासाठी रुपये २६० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासंदर्भात मा.मुख्य सचिवांच्या (महाराष्ट्र शासन) अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मराठी भाषा भवनाच्या बांधकामासाठी रुपये १५० कोटीच्या रकमेस मान्यता दिल्याचा शासन निर्णय मराठी भाषा विभागाने माहे मार्च, २०२४ मध्येच निर्गमित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या आर्थिक मान्यतेनुसार मराठी भाषा भवन इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही. चर्नी मार्ग, मुंबई येथे मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई (मुख्य केंद्र) ही इमारत उभारण्याच्या अनुषंगाने सन २०२४-२५ करीता संबंधित लेखाशीर्षाकरीता रुपये ३९.४३ कोटी इतके अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर आहेत.
(२) होय हे खरे आहे. मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई (मुख्य केंद्र) ही इमारत उभारण्याच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी रुपये २४९.५१ कोटी इतक्या रकमेचे ढोबळ अंदाजपत्रक दिनांक १७/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केले होते. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत सदर प्रस्ताव सादर केला असता समितीने रुपये १५०.१४ कोटी इतक्या बांधकाम खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक ०१/०३/२०२४ अन्वये या प्रकल्पाकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई (मुख्य केंद्र) ही इमारत उभारण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणघाट (जि.वर्धा) तहसिल कार्यालयामध्ये स्टॅम्प पेपरचा तुटवडा असल्याबाबत

**(१९) २३८१२ (१८-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील हिंगणघाट तहसिल कार्यालयात स्टॅम्प पेपरची विक्री एकच व्यक्ती करीत असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसह नागरिकांना स्टॅम्प पेपर मिळण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याचे तसेच नागरिकांना भर उन्हात लांबलचक रांगेत उभे रहावे लागत असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त कर्मचाऱ्याची नियुक्ती केल्यास स्टॅम्प विक्री नियमितपणे करण्यात येईल, अशी मागणी स्थानिक नागरिकांना उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, हिंगणघाट यांचेकडे केली असता शासनाने स्टॅम्प विक्रीचे परवाने बंद केले असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांना होणारा त्रास दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०९-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय.

हिंगणघाट, जि.वर्धा येथील कार्यरत २ मुद्रांक विक्रेत्यामधील एकाचे निधन झाल्याने शासनाकडे मुद्रांकाचा आवश्यक साठा उपलब्ध असतानाही एकच मुद्रांक विक्रेता असल्याने मागणीनुसार मुद्रांक विक्रीची अडचण निर्माण झाली होती. ही अडचण दुर करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाने ऐरा अर्बन क्रेडीट को-आप. सोसायटी लि. या पतसंस्थेस मुद्रांक विक्रीकरीता फ्रँकिंग मशिन वापराचा परवाना दिनांक २७/०५/२०२४ रोजी देण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे हिंगणघाट येथील मुद्रांक खप लक्षात घेता, जिल्ह्यातील अन्य ठिकाणी मुद्रांक विक्री करणारे परवानेधारकांना हिंगणघाट येथे त्यांचा परवाना स्थानांतरीत करुन घेण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्धा यांनी प्रवृत केले यामध्ये पुलगाव जि.वर्धा येथील मुद्रांक विक्रेत्या श्रीमती सुनिता विनोद देशमुख यांनी संमती दर्शविल्याने त्यांचेकडून अर्ज प्राप्त करुन घेवून त्यांचा पुलगांव येथील मुद्रांक विक्रीचा परवाना दिनांक २१/०६/२०२४ पासून हिंगणघाट येथे स्थानांतरीत करण्यात आला आहे.

कोरोना या आजाराने तसेच नैसर्गिक वा अन्य कारणांमुळे मृत्यू पावलेल्या मुद्रांक विक्रेत्यांच्या वारसांना मुद्रांक परवाना हस्तांतरीत करण्याबाबत,महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २७/०६/२०२४ नुसार व त्यामधील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या अर्जदार कु.रोमा निलयराव बडवाईक ज्यांचे वडील हिंगणघाट येथील मुद्रांक विक्रेते निलय बडवाईक यांचे कोराना या आजाराने निधन झाले आहे. त्यांना त्यांचे वडीलांचा मुद्रांक विक्री परवाना मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक २५/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत हिंगणघाट जि.वर्धा येथे एकूण ०४ मुद्रांक विक्री परवानाधरक कार्यरत झाल्याने जनतेला सुलभतेने मुद्रांक प्राप्त होत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथे बर्ड फ्लू या जीवघेण्या आजाराने हजारो कोंबड्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२०) २४०५८ (१८-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील तेलंगखेडी पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लू या आजाराच्या प्रादुर्भावामुळे आत्तापर्यंत हजारो कोंबड्यांचा मृत्यू झाला असल्याने पशुसंवर्धन विभागाने एक किलोमीटरचा परिसर बाधित क्षेत्र तर दहा किलोमीटर परिसर निगराणी क्षेत्र म्हणून घोषित केला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुणे, भोपाळ प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले नमुने पॉझिटिव्ह आले असल्याने प्रशासनास सतर्क राहण्याचे आदेश संबंधित यंत्रणेने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बर्ड फ्लू या आजाराचा धोका राज्यात उद्भवू नये म्हणून शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) १) बर्ड फ्लू रोग प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या बर्ड फ्लू प्रादुर्भावाबाबत निर्गमित मार्गदर्शक सुचनांन्वये प्रक्षेत्रापासून ०१ कि. मी. चा परिसर बाधित क्षेत्र व १० कि.मी. चा परिसर निगराणी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला.

२) प्रक्षेत्रावरील एकूण ८,५०१ पक्षी व १६,७७४ अंडी आणि ५४०० कि.ग्रॅ. पक्षी खाद्य शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट करण्यात आले आहे.

३) सदरहू रोग प्रादुर्भाव स्थलांतरित पक्ष्यांमार्फत होत असल्याने, ज्या भागात असे पक्षी भेट देतात त्या भागात व्यापक, नियमित व वारंवार सर्वेक्षण मोहिमा राबविण्यात येणे, जिल्हा स्तरावर शिघ्र कृती दलाची स्थापना करणे, पक्ष्यांमध्ये अनियमित मोठ्या प्रमाणात मर्तुक आढळून आल्यास असे मृत पक्षी रोगनिदानासाठी खास दुतामार्फत तात्काळ प्रयोगशाळेकडे पाठविण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर